# टेंडर नोटीस

आमचे संस्थेस महाबीज या कंपनीचे सर्टीफाईड मालदांडी शाळू (M-35-1) हे वैरण बियाणे १२५ मे.टन (४ किलो पॅकींगमध्ये २८ किलोच्या पोते) खरेदी करावयाचे आहे.सदर पुरवठा करावयाच्या बियाणांचे वर्णन, अटी व नियम याबाबतची महिती संघाच्या www.gokulmilk.coop या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. सिलबंद टेंडर्स संघाच्या गोकुळ प्रकल्प, गोकुळ शिरगाव, कोल्हापूर येथील कार्यालयात दिनांक **२९.०७.२०२४** रोजी पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत मिळतील अशा रितीने पाठविणेचे आहेत.कोणतेही टेंडर स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क संघाने राखून ठेवला आहे.

**कार्यकारी संचालक** **चेअरमन**

**कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लि., कोल्हापूर**

**बी–१, एम्.आय.डी.सी. गोकुळ शिरगाव , कोल्हापूर –४१६ २३४**

# कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लि., कोल्हापूर

## वैरण बियाणे पुरवठा टेंडर संदर्भातील नियम व अटी

१. पुरवठा करावयाच्या मालदांडी शाळू (एम ३५-१) बियाणांची कंपनी व इतर माहिती सोबत दिली आहे. त्यानुसार संबंधीत मुळ मॅन्युफॅक्च्युरींग कंपनी अथवा अधिकृत डिलर्सनी त्यांचे टेंडर देणेचे असून टेंडरसोबत पुर्तता करणेच्या कागदपत्रांचा तपशील खालीलप्रमाणे

अ) मालदांडी शाळू बियांणासाठी टेंडर सादर करणारी कंपनी मुळ मॅन्युफॅक्चरर्स कंपनी असावी किंवा कंपनीचे अधिकृत डिलर असल्यास अधिकृत विक्रेता वैध प्रमाणपत्र असणं आवश्यक आहे.

ब) टेंडर सादर करणारी मूळ कंपनी अथवा डिलरकडे पुरवठा होणाऱ्या बियाणाचे " सिडस् टेस्टींग सर्टीफिकेट" असणे बंधनकारक आहे.

क) मूळ मॅन्युफॅक्चरींग कंपनीची गतसालातील वार्षिक उलाढाल व मागणी केलेल्या बियाणांची उत्पादन क्षमता नमूद करावी तसेच अधिकृत डिलरने गतवर्षी विक्री केलेल्या १00 मे. टन वैरण बियाणांची माहीती द्यावी.

ड) मूळ मॅन्युफॅक्चरींग कंपनी अथवा डिलर यांनी बियाणे पुरवठा केलेल्या पुरवठादारांची यादी जोडणे आवश्यक आहे.

इ) नमुद केलेल्या महाबीज या कंपनीच्या बियांणांचा खरेदीसाठी टेंडरमध्ये विचार केला जाईल.

२. पुरवठादारांनी मागणी केलेल्या बियांणांचे दर त्यांचे लेटरहेड वरती देणेचे आहे.

३. टेंडरमधील दर हे सर्व करासहीत वाहतुक खर्चासह पोहोच दर देणेचा आहे. वैरण बियाणांचा पुरवठा संघाच्या ताराबाई पार्क कार्यालय, गडहिंग्लज, गोगवे, बिद्री, तावरेवाडी व सॅटेलाईट डेअरी शिरोळ येथील कार्यालयात संघाच्या आवश्यकतेनुसार पुरवठा करणेचा आहे.

४. बियाणांचा पुरवठा कालावधी हा दि.१0.0९.२०२४ पासून संघाच्या आवश्यकतेनुसार करणेचा आहे.

५. टेंडरसोबत पुरवठादारांनी रू.७५,000/- इतकी बयाणा रक्कम 'कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लि.' या नांवे काढलेल्या डिमांड ड्राफ्टद्वारे अथवा आर टी जी एस ने भरणेची आहे. टेंडर बयाणा रक्कम न भरल्यास अशा टेंडरचा विचार केला जाणार नाही. आर टी जी एस द्वारे बयाणा रक्कम जमा केल्यास यु टी आर नंबर टेंडरमध्ये नमूद करणेचा आहे. संघाचा बॅंक तपशील खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| Name of Project Authority | Kolhapur Zilla Sahakari Dudh Utpadak Sangh Ltd., Kolhapur |
| Address of Project Authority | B-1, MIDC, Gokul Shirgaon, Tal Karvir, Dist. Kolhapur, State Maharashtra Pin Code 416 234 |
| Name of Bank | Bank of Maharashtra |
| Bank A/c No. | 60182028384 |
| IFSC Code | MAHB0001575 |
| Branch Name & Address | B-1, MIDC, Gokul Shirgaon, Tal Karvir, Dist. Kolhapur, State Maharashtra Pin Code 416 234 |

६. सिलबंद लखोटयावर " वैरण बियाणे टेंडर" असा स्पष्ट उल्लेख करून सिलबंद टेंडर संघाच्या गोकुळ शिरगाव कोल्हापूर येथील कार्यालयात दि. २९.०७.२०२४ पर्यंत पोहचेल अशारीतीने पाठविणेची आहेत.

७. सदरचे बियाणाची मागणी अंदाजे असून संघाकडून शेतकऱ्यांना द्यावयाच्या संपूर्ण बियाणाची उचल न झाल्यास शिल्लक बियाणे स्वखर्चाने परत घेवून जाणेचे आहे. तसेच संघाकडून जादाची मागणी झाल्यास निश्चित केलेल्या मंजूर दरानेच वाढीव पुरवठा करणेचे आहे.

८. पेमेंट टर्मस – बियाणे पुरवठयाचे पेमेंट पुरवठा व तपासणीअंती करण्यात येईल.

९. पुरवठा करावयाच्या बियाणासंदर्भात कोणतीही तक्रार आल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी मुळ मॅन्युफॅक्च्युरींग कंपनी व पुरवठादाराची राहिल व बियांणाबाबतची योग्य ती तक्रार निवारण न झाल्यास पुरवठादारांची बयाणा रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणेत येईल. तसेच योग्य ती कायदेशीर कारवाई करणेत येईल.

१०. पुरवठादाराने दिलेल्या कालावधीमध्ये बियाणांचा पुरवठा न केल्यास पुरवठादारांची बयाणा रक्कम जप्त करणेत येईल.

११. मंजूर टेंडरधारकाने बियाणे पुरवठयापोटी रू १,००,०००/– इतकी सुरक्षा अनामत म्हणून ठेवणेची आहे. सदरची रक्कम पुरवठादाराच्या बिलातून वसूल करणेत येईल. सदरची रक्कम बियाणे पुरवठा झालेपासून चार महिन्यानंतर परत करणेत येईल.

१२. सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे गुणवत्ता हमीपत्र आपल्या लेटरहेडवरती स्वाक्षरी व शिक्क्यासह टेंडर सोबत सादर करणेचे आहे.

१३. मंजूर टेंडरधारकांनी टेंडरपोटी भरलेली बयाणा रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम यावर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

१४. कायदेशीर बाबी कोल्हापूर न्याय कार्यक्षेत्राच्या अधिन राहतील.

१५. कोणतेही टेंडर स्विकारणेचा अथवा नाकारण्याचा अधिकार संघाने राखून ठेवला आहे.

कार्यकारी संचालक

## वैरण बियांणासंबंधीची माहीती

१. बियाणे कंपनी – महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ लि. (महाबीज)

२. मालदांडी शाळू बियाणाची जात (M35 - 1) –Certified असणे आवश्यक आहे.

३. मालदांडी शाळू बियाणाचा पुरवठा संघाच्या चिलींग सेंटर्स व वैरण विभागाच्या सुचनेनुसार करणेचा आहे.

४. बियाणाचा पुरवठा ४ किलो क्षमतेच्या बॅगमधून व २८ किलोचे पोतेमधून करणेचा आहे.

५. मालदांडी शाळू बियाणाचा पुर्ण पुरवठा दि.१०.०९.२०२४ पासून संघाच्या आवश्यकतेनुसार करणेचा आहे.

६. पुरवठा केलेल्या बियाणाबाबत शेतकऱ्यांची कोणतीही तक्रार आल्यास त्याची पुर्ण जबाबदारी संबंधीत पुरवठादारावर राहील.

## तांत्रिक बाबींचा तपशील
## बिजोत्पादन मानक

| अ. नं. | तपशील | मालदांडी शाळू (प्रमाणीत) |
|---|---|---|
| १ | शुध्द बियाणे ( कमीत कमी %) | ९८.0 |
| २ | काडी कचरा ( जास्तीत जास्त %) | २.0 |
| ३ | उगवन शक्ती ( कमीत कमी %) | ७५.0 |
| ४ | आर्द्रता ( जास्तीत जास्त %) | १२.0 |
| ५ | आर्द्रतारोधक वेष्टनासाठी आर्द्रता ( जास्तीत जास्त %) | ८.0 |

---

नमूना

## गुणवत्ता हमीपत्र

आम्ही लिहून देतो की कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लि., कोल्हापूर यांना पुरवठा करणारे मालदांडी शाळू (M35 - 1) वैरण बियाणांची (प्रमाणीत) गुणवत्ता ही निश्चित केलेल्या बिजोत्पादन मानकानुसारच पुरवठा करण्यास बांधिल आहोत.

जर आम्ही पुरवठा केलेल्या बियाणांची गुणवत्ता प्रत मानांकानुसार योग्य नसल्यास व बियाणेबाबत अन्य तक्रार आल्यास ती तक्रार निवारण करण्यास व होणाऱ्याा नुकसानीस आम्ही जबाबदार राहू.

नांव / सही/ शिक्का